पुढारी

संक्षिप्त

# डी. डी. शिंदे सरकार कॉलेजमध्ये मोडी लिपी विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** सरस्वती शिंदे एज्युकेशन सोसायटीच्या डी. डी. शिंदे सरकार कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्या वतीने 'मोडी लिपीचे महत्त्व आणि त्याबद्दलची जाणीव जागृती' या विषयावर उदयसिंह राजेयादव यांचे व्याख्यान झाले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष माधुरी शिंदे, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, प्रथमेश शिंदे, डॉ. अमिता कणेगावकर, डॉ. वैशाली सारंग आदी उपस्थित होते. गायत्री चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. अस्मिता चौगुले यांनी आभार मानले.

# ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय आणि समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त १ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी सीपीआरमध्ये आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात ज्येष्ठ नागरिकांची सर्व रोग तपासणी, औषधोपचार केले जाणार आहेत. तसेच यावेळी पोलिस विभागातर्फे मोफत कायदा सल्ला व मार्गदर्शन केले जाणार आहे. या शिबिराचा ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन प्राचार्य डॉ. मानसिंगराव जगताप, डॉ. शिवाजीराव हिलगे, दिलीप पेठकर यांनी केले आहे.

# 'विवेकानंद'मध्ये आवर्तसारणी भित्तीपत्रिका उद्घाटन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे आवर्तसारणी भित्तीपत्रिका उद्घाटन समारंभ इंग्रजी विभागातील प्रा. एस. एम. रुईकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला व वाणिज्य शाखेच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी होत्या. स्वागत अलिम म्हालदार यांनी केले. संकेत कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी. बी. पाटील, डॉ. एम. एम. कारंजकर, डॉ. के. ए. उंडाळे, डॉ. डी. एस. गायकवाड, डॉ. एस. डी. शिंदे उपस्थित होते.